फिर्यादीतर्फे साक्षीदार क्रमांक (०१) यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : अशोक यादवराव सोळंके
वय : ६५ वर्षे
व्यवसाय : सेवानिवृत्त शिक्षक
राहणार : येहळेगाव सोळंके, ता. औंढा नागनाथ जि. हिंगोली

फिर्यादीतर्फे सरतपासणी विद्वान विधीज्ञ श्री.एम.व्ही.मगर यांच्याकडुन

०१. माझे शपथपत्रामधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व सांगितल्याप्रमाणे लिहिला असून तो खरा व बरोबर आहे अशी खात्री मी शपथपत्र वाचुन आणि समजुन केलेली आहे. त्यावर माझी सही असुन ती मी ओळखतो.

०२. आता मला नि.क्र. १३ अन्वये दाखल मुळ धनादेश क्र. ०१९८१६ आरोपीने मला दिनांक ३०/१२/२०२४ रोजी दिलेला धनादेश दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १४** देण्यात येतो.

०३. आता मला नि.क्र. ०४ अन्वये दाखल अ.क्र. ०२ वरील धनादेश महाराष्ट्र ग्रामीण बॅक, हिंगोली येथे सदर धनादेश पडताळणी केलेली पावती दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १५** देण्यात येतो. आता मला अ.क्र. ०३ वरील प्रस्तुत धनादेश न वठता परत आला आहे. त्याबाबतचे बॅक रिटर्न मेमो ची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यास **वस्तु 'अ'** देण्यात येतो. प्रस्तुत धनादेश न वठता परत आल्याने मी विधीज्ञांमार्फत आरोपीला कायदेशीर नोटीस पाठवीली होती. सदर नोटीसची स्थळ प्रत मला दाखविण्यात आली त्यास **नि.क्र. १६** देण्यात येतो. सदर नोटीस मी आरोपीला आरपीएडीद्वारे पाठविली होती. त्याची पावती आता मला दाखविण्यात आली ती

तीच असुन त्यास **नि.क्र. १७** देण्यात येतो. आता मला सदर नोटीस आरोपीला दिनांक १०/०१/२०२५ रोजी प्राप्त झाल्याचा ट्रॅक रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १८** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण

उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री.पी.एस.जाधव यांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब

श्रवणोत्तर स्वीकृती

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2026.11.03 11:23:12 +0530

[छाया शा. मेहरे]
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
औंढा नागनाथ

दिनांक : ०२/११/२०२६.